मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | रविवार, दि. 21 डिसेंबर 2025 | पान- 1


# पिंपरीत भाजपचा अजितदादांना मोठा धक्का!

## दोन माजी उपमहापौरांसह 17 माजी नगरसेवकांच्या हाती 'कमळ', निवडणुकीआधी समीकरणे बदलली

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढविणार असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षामध्ये माजी नगरसेवक फोडण्यावरुन स्पर्धा सुरु झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपच्या स्थायी समितीच्या माजी अध्यक्षांसह दोन माजी नगरसेवकांना पक्षात घेतल्यानंतर आता भाजपने अजित पवारांच्या राष्ट्रवादीसह शिवसेना (ठाकरे) पक्षाला मोठा दणका दिला आहे. या पक्षातील माजी दोन उमहापौर, दोन माजी स्थायी समिती अध्यक्ष यांच्यासह विविध पक्षातील १७ माजी नगरसेविकांनी आज (शनिवारी) मुंबईत भाजपमध्ये प्रवेश केला.



अजित पवार यांनी भाजपच्या दोन माजी नगरसेविकांना फोडल्यानंतर स्थानिक भाजपनेही कंबर कसली होती. भाजपनेही राष्ट्रवादी काँग्रेसला फोडाफोडीने उत्तर देण्याची तयारी सुरु केली होती. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या माजी नगरसेवकांना पक्षात घेतले. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे माजी उपमहापौर राजू मिसाळ, प्रभाकर वाघेरे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष प्रशांत शितोळे, उषा वाघेरे, माजी विरोधी पक्षनेते विनोद नढे, माजी नगरसेवक समीर मासूळकर, प्रसाद शेट्टी, प्रवीण भालेकर, जालिंदर शिंदे, माजी नगरसेविका आशा सूर्यवंशी, माजी महापौर महापौर मंगला कदम यांचे पुत्र कुशाग्र कदम यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

भाजपमधून शिवसेना (ठाकरे) पक्षात गेलेले माजी नगरसेवक रवी लांडगे पुन्हा स्वगृही परतले आहेत. याबरोबर शिवसेना (ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख, माजी महापौर संजोग वाघेरे, माजी नगरसेवक अमित गावडे, मिनल यादव, संजय काटे, काँग्रेसचे माजी नगरसेवक सद्गुरू कदम, सचिन सानप, सुखदेव नरळे, डॉ. सुहास कांबळे, अशोक मगर, नागेश गवळी यांनीही कमळ हाती घेतले आहे. अपक्ष माजी नगरसेवक नवनाथ जगताप यांचाही प्रवेश झाला आहे.

### अजित पवार सर्वस्व पणाला लावणार

उपमुख्यमंत्री पवार यांनी महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची (अजित पवार) सत्ता आणण्यासाठी सर्वस्व पणाला लावणार असल्याचे जाहीर केले आहे. भाजपमधील नाराज माजी नगरसेवकांवर जाळे टाकण्यास सुरुवात केली. भाजपच्या स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा सावळे, माजी नगरसेविका अश्विनी जाधव यांच्यासह शिवसेना (ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक सचिन भोसले, शिवसेना (शिंदे) पक्षाचे माजी नगरसेवक प्रमोद कुटे यांना पक्षात घेतला. भाजपचे सात ते आठ माजी नगरसेवक संपर्कात असल्याचा दावा या पक्षाचा आहे.

### अजित पवार यांच्यासमोर भाजपचे कडवे आव्हान

» पिंपरी-चिंचवड शहर एके काळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला होते. मात्र, २०१७ मध्ये भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसकडून सत्ता खेचून घेतली. भाजपचे तीनवरुन ७७ नगरसेवक झाले. शहरावर १५ वर्षे एकहाती राज्य करणाऱ्या पवार यांनी महापालिका निवडणुकीत भाजपसोबत युती व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांच्या पक्षाच्या बहुतांश माजी नगरसेवकांचीही युती व्हावी अशीच भूमिका होती. परंतु, शहर भाजपने स्वबळावर लढण्याचा आग्रह कायम ठेवला. त्यातून निवडणूक जाहीर होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) सोबत मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. पवार यांच्यासमोर भाजपने कडवे आव्हान निर्माण केले आहे.

---

# प्रभाग 2 मध्ये अतिश बारणे यांच्या प्रचाराचा नारळ फुटला

## मोशीतील नागेश्वर महाराज मंदिरात पूजन करून राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचार मोहिमेचा प्रारंभ

**पिंपरी | प्रतिनीधी**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे इच्छुक उमेदवार आतिश बारणे यांच्या प्रचाराचे नारळ मोशीचे ग्रामदैवत नागेश्वर महाराज मंदीर येथे फोडून आपल्या प्रचार मोहिमेचा अधिकृत प्रारंभ केला. यावेळी प्रसिध्द उद्योजक संतोष बारणे, राष्ट्रवादीच्या प्रबळ उमेदवार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शहराध्यक्ष कविता आल्हाट यांच्यासह मोशी ग्रामस्थ, मित्र परिवार यावेळी सहभागी झाले होते.



मंदिरात दर्शन घेऊन विजयाचा संकल्प केल्यानंतर प्रभागात प्रचार फेरी काढण्यात आली. या रॅलीमध्ये शेकडो कार्यकर्त्यांनी उत्साहात सहभाग घेतला. 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.घरोघरी उमेदवार अतिश बारणे यांचे औक्षण आणि स्वागत करण्यात आले.

गेल्या काही वर्षांत प्रभागात राबवलेली विकासकामे आणि जनसंपर्काच्या जोरावर नागरिकांनी या रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. "पक्षश्रेष्ठींचा आमच्यावर पूर्ण विश्वास आहे आणि जनतेचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे, त्यामुळे आम्हालाच कामाची संधी मिळेल," असा ठाम विश्वास यावेळी उमेदवार अतिश बारणे यांनी व्यक्त केला.

> "आज ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन आम्ही प्रचाराला सुरुवात केली आहे. प्रभागातील नागरिकांचे प्रश्न सोडवणे आणि सर्वांगीण विकास करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. आज ज्या पद्धतीने नागरिकांनी प्रचारास प्रतिसाद दिला, त्यावरून हे स्पष्ट आहे की जनतेला विकास हवा आहे. पक्षाने दिलेल्या जबाबदारीला आम्ही पूर्णपणे न्याय देऊ.
>
> **- आतिश बारणे, इच्छुक उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी.**

# सर्वपक्षीय मातब्बर नेत्यांचा भाजपात जाहीर प्रवेश!

## मिशन- PCMC : भाजपा आमदार महेश लांडगे यांचा राष्ट्रवादीवर " सर्जिकल स्ट्राईक"

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजपातील काही माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात बारामती गेस्टहाउसमध्ये प्रवेश करुन घेतला. याला जोरदार प्रत्युत्तर देत भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे आज सर्वपक्षीय 22 दिग्गजांचा भाजपात प्रवेश करण्यात आला.

महापालिका निवडणूक आचार संहिता सुरू झाली आहे. दि. 15 जानेवारी 2026 रोजी मतदान आणि दि. 16 जानेवारी रोजी निकाल घोषीत होईल. महापालिका निवडणुकीत भाजपा आणि राष्ट्रवादी अजित पवार गट स्वबळावर लढणार आहेत. शहरात राजकीय दिवाळी सुरू झाली असून, अजित पवारांनी वाजवल्या 'टिकल्या'; तर महेश लांडगेंनी लावला 'सुतळी बॉम्ब' असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

विशेष म्हणजे, प्रवेशांसाठी कोणत्याही स्थानिक नेत्याला पक्षश्रेष्ठींकडे विशेष 'फिल्डिंग' लावावी लागली नाही. त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या काळात शहरातील निर्णय शहरात होतात, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. आमदार महेश लांडगे यांनी भाजपा पिंपरी-चिंचवड शहराचे नेते म्हणून राष्ट्रवादीला अक्षरशः घायाळ केले आहे. त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा मोठा 'सपोर्ट' असल्याचे सिद्ध झाले आहे.



> पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-2025-26 च्या निमित्त शहरातील सर्वपक्षीय मातब्बर नेते, पदाधिकारी, माजी नगरसेवक यांनी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये अधिकृत प्रवेश केला. सर्व पिंपरी-चिंचवडकर मान्यवरांचे भाजपा परिवारात हार्दिक स्वागत करतो. देव-देश-धर्म अन् संस्कृतीसाठी कटिबद्ध राहून पिंपरी-चिंचवडमध्ये "विकासाभिमुख हिंदुत्वाच्या" पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टी निर्विवाद विजय मिळवण्याचा निर्धार आम्ही केला आहे. .
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

**भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेल्या मान्यवरांची यादी पुढीलप्रमाणे :**

१) माजी महापौर उभाठा गटाचे नेते – श्री संजोगजी वाघेरे पाटील

२) माजी अध्यक्ष, स्थायी समिती – सौ. उषाताई वाघेरे

३) राष्ट्रवादीचे माजी स्थायी समिती अध्यक्ष – श्री प्रशांत शितोळे

४) राष्ट्रवादीचे माजी विरोधी पक्षनेते – श्री विनोद नढे

५) राष्ट्रवादीचे माजी उपमहापौर – श्री प्रभाकर वाघेरे

६) माजी उपमहापौर – श्री राजू मिसाळ

७) उभाठा गटाचे नगरसेवक – श्री अमित गावडे

८) उभाठा गटाच्या नगरसेविका – सौ. मीनलताई यादव

९) श्री रवी लांडगे

१०) माजी नगरसेवक – श्री संजय नाना काटे

११) राष्ट्रवादीच्या माजी नगरसेविका – सौ. आशाताई सूर्यवंशी

१२) श्री प्रविण भालेकर

१३) श्री जालिंदर बापु शिंदे

१४) श्री सचिन सानप (स्वतः व पत्नी)

१५) श्री दादा सुखदेव नरळे (स्वतः व पत्नी)

१६) श्री सदगुरु कदम

१७) श्री समीर मासुळकर (स्वतः व पत्नी)

१८) डॉ. श्री सुहास कांबळे

१९) श्री कुशाग्र कदम

२०) श्री अशोक मगर

२१) श्री नागेश गवळी

२२) श्री प्रसाद शेट्टी – माजी नगरसेवक.

२३) श्री नवनाथ जगताप – माजी स्थायी समिती अध्यक्ष.

२४) श्री प्रभाकर वाघेरे – माजी उपमहापौर.

# महापालिकेच्या घंटागाडीत कचरा विलगीकरण करून देण्याचे आवाहन

## आरोग्य विभागाकडून नागरिकांना घनकचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करण्याचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून घनकचरा व्यवस्थापनाबाबत विविध उपक्रम राबवले जात असून नागरिकांमध्ये कचरा विलगीकरणाबाबत जनजागृती केली जात आहे. नागरिकांनी कचरा संकलनासाठी आलेल्या महापालिकेच्या घंटागाडीत कचरा विलगीकरण करून द्यावा, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ नुसार घरगुती तसेच व्यावसायिक कचऱ्याचे विलगीकरण करून देणे बंधनकारक आहे. त्यानुसार नागरिकांनी ओला कचरा, सुका कचरा, घरगुती घातक कचरा, सॅनिटरी कचरा, ई-कचरा असे विविध कचऱ्याचे प्रकार असून त्यानुसार कचऱ्याचे विलगीकरण करून द्यावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

योग्य पद्धतीने विलगीकरण झाल्यास पुढील टप्प्यांमध्ये कंपोस्टिंग व पुनर्वापर प्रक्रिया सुलभ होते, अशी माहिती देण्यात आली. आरोग्य विभागाकडून कचरा संकलनावेळी तपासणीसाठी निरीक्षण पथके कार्यरत असून नियमांचे पालन न झाल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**कचऱ्याचे प्रकार..**

ओला कचरा : भाजीपाल्याच्या साली, अन्नाचे उरलेले तुकडे, फुलांचा कचरा, बागेतील पाने व अन्य जैविक कचरा.

सुका कचरा : प्लास्टिक, कागद, धातू, बाटल्या, पॅकेजिंग साहित्य, थर्माकोल तसेच इतर पुनर्वापरयोग्य वस्तू.

घरगुती घातक कचरा : ट्यूबलाईट, बॅटरी, बल्ब, तुटलेल्या धारदार वस्तू, रसायने, इंजेक्शन व जैववैद्यकीय कचरा.

सॅनिटरी कचरा : सॅनिटरी पॅड्स, डायपर्स, बँडेजेस.

ई-कचरा : बिघडलेले संगणक, लॅपटॉप, सीपीयू, दूरदर्शन संच तसेच इतर इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक उपकरणे.



# तर मंगल कार्यालये, सभागृहे, लॉन्समध्ये विवाह बंद!

## पुण्यातील मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्ससाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र सक्तीचे करण्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील मंगल कार्यालये, सभागृह आणि लॉन्सना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे. असे असूनही हे प्रमाणपत्र घेण्यास टाळाटाळ केली जात असल्याने प्रमाणपत्र न घेणाऱ्या २७२ आस्थापनांना मंडळाने नोटिसा बजावल्या. यानंतर आता महापालिकेने मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्सना नवीन परवाना अथवा परवाना नूतनीकरणासाठी मंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची सक्ती केली आहे.

पुण्यातील मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्समध्ये होणाऱ्या विवाहांमुळे ध्वनिप्रदूषणासह इतर प्रकारचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत होते. याची दखल घेऊन राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला यावर कार्यवाही करण्याचे निर्देश २०१५ मध्ये दिले होते. मंडळाने या प्रकरणी समिती स्थापन करून मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्ससाठी नियमावली तयार केली. या नियमावलीनुसार त्यांना मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले. त्यानंतर मंडळाने महापालिकेकडून नोंदणीकृत मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्सची यादी मागविली. त्यावर महापालिकेने १२ मार्च २०२४ रोजी सर्व आस्थापनांची यादी दिली.

मंडळाने १८१ आस्थापनांना कारवाई का करू नये, अशी विचारणा करणाऱ्या नोटिसा २८ मार्च २०२४ रोजी बजावल्या. त्यानंतर २५ एप्रिल २०२४ रोजी आणखी ९१ आस्थापनांना नोटिसा बजाविण्यात आल्या. शहरातील एकूण २७२ आस्थापनांना नोटिसा देण्यात आल्या असून, मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यापैकी ६९ आस्थापनांना प्रत्यक्ष भेटी देऊन तपासणीही केली आहे.



### ना-हरकत प्रमाणपत्राची सक्ती

» मंडळाने महापालिका आणि पोलिसांसमवेत यंदा संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र न घेणाऱ्या आस्थापनांना यापुढे महापालिकेकडून नवीन परवाना दिला जाणार नाही, तसेच परवाना नूतनीकरणही केले जाणार नाही, असा निर्णय घेण्यात आला. यामुळे शहरातील सर्व मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्स यापुढे मंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय चालविता येता येणार नाहीत.

> मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्सला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र बंधनकारक आहे. तरीही ते घेण्यास या आस्थापनांकडून टाळाटाळ केली जात होती. या प्रकरणी सर्वांना नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत. याचबरोबर महापालिकेकडूनही आता नवीन परवाना अथवा परवाना नूतनीकरणासाठी मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र सक्तीचे करण्यात आले आहे.
>
> \- कार्तिकेय लंगोटे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

> महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय यापुढे मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्सला नवीन परवाना दिला जाणार नाही. तसेच, त्यांचे परवाना नूतनीकरणही केले जाणार नाही. दरवर्षी मार्चमध्ये या आस्थापनांचे परवाना नूतनीकरण होते. त्या वेळी त्यांना मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल
>
> \- सूर्यकांत देवकर, सहायक आरोग्य अधिकारी, महापालिका

> शहरातील जुन्या छोट्या कार्यालयांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्राचा नियम लागू नाही. मोठ्या आणि नवीन कार्यालयांना तो बंधनकारक आहे. याबाबत जागरूकता नसल्याने हे प्रमाणपत्र घेण्याचे प्रमाण कमी होते. मंगल कार्यालयांकडून कचरा व्यवस्थापनासह इतर सर्व नियमांचे पालन केले जात होते. आता सर्व मंगल कार्यालयांकडून हे प्रमाणपत्र घेतले जाईल.
>
> \- किशोर सरपोतदार, अध्यक्ष, महाराष्ट्र केटरिंग असोसिएशन

# फुकटात सभा घ्याल तर कारवाई अटळ; पालिकेने जारी केले नवे दरपत्रक

## विनापरवाना सभा घेणे आता पडणार महागात! पुणे महापालिकेने निश्चित केले सभेचे दर; उल्लंघन केल्यास दीडपट दंड.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या परवानगीविना प्रचारासाठी कोपरा, चौक सभा घेणे उमेदवारांना महागात पडणार आहे. या सभांसाठी पालिकेने जागांचे दर निश्चित केले आहेत. दर भरल्याशिवाय सभा घेतल्याची माहिती क्षेत्रीय कार्यालय निवडणूक अधिकाऱ्यास देणार असून त्यानुसार कारवाई होईल. सभेसाठी प्रती चौरसमीटर ९ रूपये शुल्क पालिकेने निश्चित केले आहे.

चौक सभेसाठी किमान २० हजार तर कोपरा सभेसाठी ८ हजार २०० रूपये मोजावे लागणार आहेत. आकाशचिन्ह-अतिक्रमण विभागाने याचे आदेश काढले आहेत. या पूर्वी अनेक उमेदवार प्रचारसभा संपल्यानंतर केवळ पोलिसांची परवानगी घेवून सभा घेत असत, त्यामुळे महापालिकेकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. दर भरल्याशिवाय सभा घेतल्याची माहिती क्षेत्रीय कार्यालय निवडणूक अधिकाऱ्यास देणार असून त्यानुसार कारवाई होईल. सभेसाठी प्रती चौरसमीटर ९ रूपये शुल्क पालिकेने निश्चित केले आहे.

**असे असतील दर**

– चौक सभा : ४ ते पाच हजार नागरिकांसाठी २ हजार चौरसमीटर जागेसाठी १८ हजार रूपये भाडे तर २ हजार रूपये साफसफाई शुल्क असेल. याशिवाय १० हजार अनामत रक्कम असेल.

– कोपरा सभा : २००० ते अडीच हजार नागरीकांसाठी ८०० चौरसमीटर जागेसाठी ७ हजार २०० रूपये भाडे तर १ हजार रूपये साफसफाई शुल्क असेल. या शिवाय ४ हजार रूपये अनामत रक्कम असेल.

– सभेसाठी शाळा, ॲमेनिटी स्पेस, रिकामी जागांसाठी मागणीनुसार प्रती चौरस मीटर ९ रूपये दराने शुल्क आकारले जाईल. तसेच १ हजार रूपये सफाई शुल्क असेल. याशिवाय, प्रती दिवस जे भाडे निश्चित होईल त्याच्या ५० टक्के अनामत रक्कम असेल.




### सभांसाठी अटी

» विनापरवानगी सभा घेतल्यास दिडपट शुल्क
» शुल्क न भरल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास कळविणार.
» सभेसाठी पोलिसांचे ना हरकत प्रमाणपत्र बंधनकारक.
» सभेसाठी खड्डे न घेता १० फूट लांबी-रूंदीचे स्टेज आवश्यक
» खड़े घेतल्यास प्रती खड्डा २ हजार दंड आकारणार.
» एका जागेसाठी दोन अर्ज आल्यास निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेणार.

# काँग्रेसच्या भूमिकेमुळे आघाडीत बिघाडी? दोन्ही राष्ट्रवादींच्या एकत्रीकरणाची चर्चा

## "काँग्रेसने भूमिका बदलली, तर आम्हालाही विचार करावा लागेल"; शशिकांत शिंदे यांच्या विधानाने राजकीय वर्तुळात खळबळ.

**पुणे | प्रतिनिधी**

महाविकास आघाडी म्हणून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांनी महापालिका निवडणूक लढविण्याच्या हालचाली सुरू असतानाच, पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा जोर धरू लागली आहे. मात्र, ही घडामोड घडणार की नाही याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने थेट काँग्रेसकडे बोट दाखवले आहे.

महाविकास आघाडीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला काँग्रेसचा विरोध नसला तरी मनसे आघाडीत आल्यास काँग्रेसचा विरोध असल्याचे सांगण्यात येत आहे. महाविकास आघाडीबाबत काँग्रेसने वेगळी भूमिका घेतल्यास आम्हालाही इतर पर्यायांचा विचार करावा लागेल, असे सूचक विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पुण्यात बोलताना केले.




### राशपची काँग्रेस – शिवसेनेला विचारणा

» सूत्रांच्या माहितीनुसार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी काँग्रेस तसेच शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी, अजित पवारांना सोबत घेतल्यास आघाडी होईल का, असा थेट प्रश्न उपस्थित केला. तसेच मनसेला आघाडीत घेण्याबाबत काय भूमिका आहे, अशी विचारणाही केली. यावर काँग्रेसकडून, आम्ही सध्या आघाडी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि ठाकरे सेनेसोबत चर्चा करत आहोत.

यामुळे महाविकास आघाडीच्या पालिका निवडणुकीतील भवितव्याबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी काँग्रेस तसेच शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी, अजित पवारांना सोबत घेतल्यास आघाडी होईल का, असा थेट प्रश्न उपस्थित केला. तसेच मनसेला आघाडीत घेण्याबाबत काय भूमिका आहे, अशी विचारणाही केली. यावर काँग्रेसकडून, आम्ही सध्या आघाडी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि ठाकरे सेनेसोबत चर्चा करत आहोत. याचवेळी, अजित परावारांच्या राष्ट्रवादीला आघाडीत घेण्यासाठी काँग्रेसची नेमकी भूमिका काय आहे, अशी विचारणा शिंदे यांनी शहरातील पदाधिकाऱ्यांकडे केल्याचे समजते. त्यामुळे अप्रत्यक्षपणे काँग्रेसकडूनच दोन्ही राष्ट्रवादींच्या एकत्रीकरणावर शिक्कामोर्तब करून घेण्याचा डाव सुरू असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादी किंवा मनसेचा कोणताही प्रस्ताव आमच्याकडे आलेला नाही. तो प्रस्ताव राशपकडे आलेला आहे. त्यामुळे तुमचा निर्णय आम्हाला कळवावा, त्यानंतर आम्ही निर्णय घेऊ, अशी भूमिका मांडण्यात आली. शिवसेनेकडूनही साधारणपणे हीच भूमिका घेण्यात आली. त्यामुळे राशपकडून आधी आघाडीतील घटक पक्षांची भूमिका स्पष्ट होण्याची प्रतीक्षा करत आहे.

> "तूर्तास आमची आघाडी ही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, ठाकरे सेना आणि काँग्रेससोबत आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणे किंवा मनसे-शिवसेना एकत्र येणे, याचा आमच्याशी थेट संबंध नाही. त्यांचा निर्णय झाल्यानंतर, आमच्याकडे प्रस्ताव आल्यावरच फायदा-तोटा पाहून काँग्रेसची भूमिका ठरवू. ज्यांचा प्रस्तावच नाही, त्यावर बोलण्यात अर्थ नाही."
>
> - अरविंद शिंदे (काँग्रेस शहराध्यक्ष)

> "महाविकास आघाडीबाबतचा अंतिम निर्णय वरिष्ठ पातळीवर घेतला जाईल. आमची मनसेसोबत चर्चा सुरू आहे, मात्र अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. आम्ही आघाडी म्हणूनच लढणार, यावर एकमत झाले आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा निर्णय हा पूर्णपणे राष्ट्रवादीचा आहे. जर-तरला राजकारणात किंमत नसते. त्यांनी त्यांचा निर्णय घ्यावा. आम्हाला जे आदेश मिळतील, त्यानुसारच भूमिका असेल."
>
> - गजानन थरकुडे (ठाकरे सेना, शहर प्रमुख)

# भीमाशंकरमध्ये होणार मोठे बदल! 2027 च्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची जोरदार तयारी

## गर्दी व्यवस्थापन आणि भाविकांच्या सुविधांना सर्वोच्च प्राधान्य; जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेतला भीमाशंकर विकास आराखड्याचा आढावा.

**पुणे | प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर-नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांची संभाव्य गर्दी विचारात घेता गर्दी व्यवस्थापन व इतर सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता विविध विकासकामे गतीने पूर्ण करण्याबाबत नियोजन करावे, विकासकामे करतांना गुणवत्तापूर्वक, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील याकडे लक्ष द्यावे,असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा (कुंभमेळा २०२७-गर्दी व्यवस्थापन व इतर सोई-सुविधा), विकास आराखडाबाबत आढावा



बैठकीत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, पुणे ग्रामीणचे उपधीक्षक दिलीप शिंदे, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ.विलास वाहने,

श्री क्षेत्र भीमाशंकरचे विश्वस्त यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर येथे महसूल, पोलीस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम, देवस्थानाचे पदाधिकारी आदींनी बैठक आयोजित करुन करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत माहिती देण्यात यावी. पोलीस प्रशासनाने वाहतूक नियोजन व गर्दी व्यवस्थापनाबाबत नियोजनाबाबत माहिती द्यावी.

देवस्थानाच्या सूचना विचारात घेवून कार्यवाही करावी. कामासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या परवानग्या घेण्याची कार्यवाही करावी. पोलीस विभागाने नियंत्रण कक्ष उभारण्याबाबत कार्यवाही करावी.श्री क्षेत्र भिमाशंकर येथे येणाऱ्या भाविकांकरिता असलेल्या सर्व बाजूंचा विचार करुन रस्त्याचे सर्वेक्षण करुन करावयाच्या कामकाजाबाबत अदांजपत्रक तयार करावे.पाणी पुरवठा विभागाने भाविकांना पुरेशा पाणी उपलब्ध होईल, याकरिता नियोजन करावे.

### टेंड सिटी उभारण्याबाबत सर्वेक्षण करावे

» एसटीपी बाबत सुधारित आराखडा तयार करून मान्यतेकरिता सादर करावा.निगडाळे येथील भाविक सुविधा केंद्र व वाहनतळाचे काम करावीत.भाविकाच्या राहण्याच्यादृष्टीने टेंट सिटी उभारण्याबाबत वाहनतळाची जागा सोडून इतरत्र ठिकाणाचे सर्वेक्षण करावे.एकूणच श्री क्षेत्र भीमाशंकर येथील सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने करतांना भाविकांना त्रास होणार नाही, याद्दष्टीने नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.